**सातारा जिल्हा पोलीस भरती सन २०१८**

**<u>लेखी परिक्षेबाबत पात्र उमेदवारांकरीता सुचना</u>**

**१) पोलीस भरती २०१८ ची लेखी परीक्षा दिनांक ०७/०४/२०१८ रोजी सकाळी ०८.०० वाजता <u>महाराष्ट्र स्कुटर्स, प्रा. लि. जुनी एमआयडीसी, सातारा</u> या ठिकाणी घेण्यात येणार आहे.**

२) लेखी परीक्षेस १:१५ प्रमाणे पात्र झालेल्या उमेदवारांची सामाजिक व समांतर आरक्षण निहाय यादी (कट ऑफ लिस्ट सह) सातारा जिल्हा पोलीस दलाच्या www.satarapolice.gov.in या संकेतस्थळावर, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा व पोलीस परेड मैदान, सातारा येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

३) उमेदवारांनी लेखी परिक्षेस येताना सोबत या कार्यालयाने मैदानी चाचणीवेळी अदा केलेले ओळखपत्र व ओळखपत्राचा पुरावा म्हणून आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना पॅन कार्ड यापैकी कोणतेही <u>दोन मुळ</u> ओळखपत्र सोबत घेवून येणे बंधनकारक आहे अन्यथा उमेदवारास लेखी परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) उमेदवारांनी सोबत डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन मोबाईल, पिशवी, इलेक्ट्रॉनिक घडयाळ, कॅलक्युलेटर, ब्लूटूथ हेडफोन व कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, कोरे कागद असे साहित्य आणू नये.

५) दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रानिक उपकरणे, वहया, नोटस्, इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास, स्वत: जवळ बाळण्यास त्याचा वापर करण्यास अथवा त्याचे वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्रा बाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. जर असे साहित्य लेखी परिक्षेवेळी सोबत ठेवलेचे निदर्शनास आल्यास सदर उमेदवारास अपात्र (DisQualify) करणेत येईल.

६) परिक्षार्थी उमेदवार यांनी लेखी परिक्षेकरिता वेळेत हजर रहावे. विलंब झाल्यास त्यांची कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. त्यांना परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. तसेच त्यांना लेखी परिक्षेकरिता पुन्हा संधी देण्यात येणार नाही.

७) लेखी परिक्षा सुरु झाल्यानंतर ते परिक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी परिक्षाकक्षा बाहेर जाण्याची परवानगी कोणत्याही परिस्थतीमध्ये दिली जाणार नाही.

८) परिक्षेच्या वेळी प्रश्नपत्रिका अत्यंत काळजीपुर्वक वाचून त्याचे अनुपालन करावे.

९) **उमेदवारांना लेखी परीक्षेकरिता पॅड व पेन, चेस्ट नंबर पुरविण्यात येणार आहे.**

**१०)** जर एखादा उमेदवार लेखी परिक्षेवेळी गैरवर्तन करताना आढळला तर त्याला भरती प्रक्रियेतुन अपात्र ठरवणेत येईल.